**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** सुधाकर आकाराम हुले.

**वय** - ४२ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार.-** उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील यांच्यामार्फत.**

**१.** मला दि. ०४.०६.२०२४ रोजी आजरा पोलिसांनी पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते. पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून कोणतीही देशी व विदेशी दारु जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला नव्हता. पोलिसांनी मला उत्तूर पोलिस चौकीत बोलावून काही कागदांवरती स्वाक्ष–या घेतल्या होत्या. मला त्यातील मजकूर माहिती नाही.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४.०६.२०२४ रोजी आजरा पोलिसांनी मला उत्तूर ते गडहिंग्लज रस्त्यावरील मोरे हॉटेलच्या अलीकडे बोलावून आरोपीच्या ताब्यातून देशी व विदेशी दारुच्या १३३ सिलबंद बाटल्या जप्त करुन त्यातील प्रत्येकी एक बाटली रासायनिक तपासणीकामी वेगळी करुन त्याबाबतचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एस. एस. इंजल वकील यांच्यामार्फत.**

**३.** उलट तपास नाकारला.

**उलट तपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २७.०९.२०२४. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.